श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

फेब्रुवारी २०२५ | वर्ष–१ अंक–२ | मासिक, पाने १२ | Regn. no. - MAHMAR/2022/86035

## ७६वा प्रजासत्ताक दिन एसव्हीजेसीटी, डेरवण येथे उत्साहात साजरा

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या क्रीडासंकुलामध्ये भारताचा ७६वा प्रजासत्ताक दिन मोठ्या दिमाखात साजरा झाला. प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध दंतचिकित्सक डॉ. संदेश मयेकर, Cosmetic and Aesthetic Dentist, यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सन्माननीय अतिथी म्हणून चार्टर्ड अकाउंटंट स्वाती मयेकर व अमेरिकेतील प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. अनिल नेरुरकर उपस्थित होते. या वेळी संस्थेचे विश्वस्त श्री. अशोकराव जोशी आणि श्री. विकासराव वालावलकर; शिक्षण, वैद्यकीय, क्रीडा विभागांचे प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ध्वजारोहण, राष्ट्रगीत, राज्यगीत, ध्वजगीत यांचे गायन झाल्यावर संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन केले गेले. शाळेतील पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक या विभागातील विद्यार्थ्यांनी इंग्रजी, संस्कृत, स्पॅनिश, जर्मन या विविध भाषांतून भारतीय प्रजासत्ताकाच्या गेल्या ७६ वर्षांतील देदीप्यमान कामगिरीचा आढावा घेणारी भाषणे केली.

नर्सरीमधील श्लेशा पाकळे हिने प्रजासत्ताक हा दिवस आपल्याला शांतता, प्रेम आणि एकात्मतेने राहायला शिकवतो असे विचार आपल्या भाषणातून व्यक्त केले. ज्युनिअर केजीतील अभिष प्रधान याने आपल्या भाषणातून संविधानाचे महत्त्व विशद करत स्वातंत्र्य सैनिकांना आदरांजली वाहिली. सिनियर केजीतील विहंग अधटराव याने भारतीय तिरंगा याविषयी सविस्तर माहिती दिली. इयत्ता पहिलीतील मायरा खलपे या विद्यार्थिनीने विविध सण साजरे करणारा आणि विविध परंपरांनी नटलेल्या भारताची माहिती सर्वांना करून दिली. इयत्ता दुसरीची विद्यार्थिनी भव्या गुलशनकुमार हिने प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी भारताची राजधानी दिल्ली येथे विविध संस्कृतींची झलक दर्शविणारे चित्ररथ तसेच आकाशात दाखवल्या जाणाऱ्या विमानांच्या कसरती यांचे अतिशय सुंदर वर्णन केले. तिसरीचा विद्यार्थी शौर्य पवार याने भारताची विविध राष्ट्रीय प्रतीके तसेच इयत्ता चौथीतील रुद्र मोहिरे व आरोही मोहिरे यांनी माझ्या स्वप्नातला भारत व त्याने केलेली प्रगती, इयत्ता सहावीतील स्वराज यादव व ओवी बोंडे या विद्यार्थ्यांनी भारताचे नैसर्गिक सौंदर्य, संस्कृती व विविधतेत एकता, विज्ञान, तंत्रज्ञान व अवकाशात केलेली मोठी प्रगती यावर आपले मनोगत मांडले.



*स्वतंत्रता के भीषण रण में, लखकर बढ़े जोश क्षण क्षण में, कांपे शत्रु देखकर मन में,*
*मिट जाए भय संकट सारा ।। झंडा ऊंचा रहे हमारा ।*

*प्रमुख पाहुणे डॉ. संदेश मयेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण*



प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते जलतरण स्पर्धेत राष्ट्रीयस्तरावर शाळेचे प्रतिनिधित्व केलेल्या तन्मयी जाधव हिचा सत्कार



सन्माननीय अतिथी स्वाती मयेकर विद्यार्थ्यांना बचत व नियोजनाविषयी मार्गदर्शन करताना

इयत्ता सातवीतील आराध्या राजेशिर्के हिने संविधानातील नागरिकांचे अधिकार व नागरिकत्व जपण्याबाबत तर इयत्ता ११वीतून धवलसिंह यादव या विद्यार्थ्याने आजच्या प्रजासत्ताक दिनी फक्त इतिहासात न रमता देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी आपले प्रामाणिक योगदान देऊ या अशा प्रकारचे विविध विचार विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेतून व्यक्त केले.

शाळेत शिकवल्या जाणाऱ्या विविध भाषांमधून व्यक्त होताना इयत्ता ८वीतील मधुरा मुणगेकर व अनुश्री कोळेकर यांनी संस्कृत भाषेतून राष्ट्राच्या जडणघडणीत बालकाची भूमिका तसेच विश्व कल्याणकारी विकसित राष्ट्राच्या जडणघडणीत सक्रिय सहभाग घेऊ या असे आवाहन केले. इयत्ता ९ वीतील राधा पाटणकर व चिन्मयी मोहिरे यांनी कर्तव्यपथावर होणारी परेड ही भारताच्या संस्कृतीचे व परंपरेचे सादरीकरण करते हे जर्मन भाषेतून व्यक्त केले. ईशा रानडे व ईश्वरी सुर्वे या विद्यार्थिनींनी स्पॅनिशमधून इंडोनेशिया व भारत या दोन देशांचे सलोख्याचे संबंध यावर विचार मांडले. तसेच द्वितीय वर्षात वैद्यकीय शिक्षण घेत असलेली असरीन चौधरी हिने हिंदीतून भाषण करत राष्ट्राच्या जडणघडणीमध्ये युवकांचा सहभाग तसेच एक जबाबदार नागरिक म्हणून कर्तव्याची आठवण करून दिली.

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत राष्ट्रीय आणि राज्यस्तरावर शाळेचे प्रतिनिधित्व केलेल्या विविध गुणवंत खेळाडू विद्यार्थ्यांचा सत्कार रोख पारितोषिके प्रदान करून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमासाठी उपस्थित असणाऱ्या मान्यवरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. प्रथम सन्माननीय अतिथी म्हणून लाभलेल्या सौ. स्वाती मयेकर यांनी विद्यार्थ्यांना बँकेमध्ये खाते उघडून आपल्या पैशांची बचत करावी असे सुचवले. फॉर्च्यून मासिकाने केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारे ५५% लोकसंख्येला आर्थिक कारणामुळे आरोग्य समस्या आहेत. त्या समस्यांपासून स्वतःचा बचाव करायचा असेल तर पैशाचा आणि कामाचा आदर करा. लक्ष्मीदेवीबरोबर सरस्वती देवतेचाही आदर करा. तुमच्या भविष्याचे नियोजन करा. दर महिन्याला थोडीथोडी निरंतर बचत करून ते पैसे गुंतवा व वाढवा, असा सल्ला त्यांनी सर्व उपस्थितांना दिला.

डॉ. अनिल नेरुरकरांनी आपल्या भाषणामध्ये प्रत्येकाला चार गुण विकसित करण्याचे आवाहन केले. बुद्ध्यांक, भावनांक, आर्थिक बुद्धिमत्ता आणि कारुण्य भावना यांचे जीवनातील महत्त्व सांगून दया, दमन, दान या गुणांचे मूल्य सोदाहरण स्पष्ट केले. पराकोटीच्या दातृत्वातून श्रीकाकामहाराज आणि श्री. वालावलकर



सन्माननीय अतिथी डॉ. अनिल नेरुरकर विद्यार्थ्यांना गुणवंत होण्याचे महत्त्व सांगताना



प्रमुख पाहुणे डॉ. संदेश मयेकर विद्यार्थ्यांना साकारात्मकता व मेहनतीचे श्रेष्ठत्व विशद करताना



*इ. नर्सरी, श्लेशा पाकळे*



*इ. सिनियर केजी, विहंग अधटराव*



*इ. ९ वी, राधा पाटणकर व चिन्मयी मोहिरे - जर्मन भाषेतून विचार मांडताना*

साहेबांनी डेरवणसारख्या ठिकाणी निर्माण केलेल्या सामाजिक क्रांतीच्या उपक्रमाकरिता धन्यवाद व्यक्त केले.

प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणाऱ्या डॉ. संदेश मयेकर यांनी विद्यार्थ्यांशी हितगुज साधताना सांगितले प्रत्येक व्यक्तीने आपल्याला आयुष्यात काय करायचे ते ठरवून लिहून ठेवावे, त्याप्रमाणे वागावे व कालानुरूप त्यात बदल करावेत. जाहिरातीमध्ये दाखविल्याप्रमाणे नट-नट्या ते उत्पादन कधीच वापरत नाहीत. ते उत्पादन वाढवण्यासाठी प्रोत्साहन देतात व त्यातून पैसे कमवतात. त्यामुळे नट-नट्यांचे अनुकरण करू नका. प्रत्येकाच्या आयुष्यात एक तरी मार्गदर्शक असावा जेणेकरून त्या मार्गदर्शकाकडे तुमचे मन मोकळे करता येईल, मानसिक ताण निघून जाईल. स्वतःचे Analysis करून स्वतःची ताकद ओळखावी. शाळा आणि स्पोर्ट्स अकादमीमध्ये मिळणाऱ्या भरपूर सुविधांचा फायदा करून घेऊन राष्ट्रीय खेळाडू बनावे. वेळ वाया घालवू नये. पैसा परत येऊ शकतो पण वेळ नाही. तसेच इतरांना मदत करायची सवय लावून घ्या. चांगल्या सवयी लावून घ्या. सकारात्मक विचार करा आणि हसून प्रत्येक गोष्टीकडे सकारात्मकतेने पाहा. इच्छा करा व त्यासाठी कठोर मेहनत करा. त्याने तुमची स्वप्नं साकार होतील.

मान्यवरांच्या भाषणानंतर विविध राज्यांची संस्कृती आणि परंपरा दाखवणारे काश्मीरी, बंगाली, आसामी, गोवन, मणिपुरी व गुजराती हे नृत्य प्रकार विद्यार्थ्यांनी सादर करून विविधतेतून एकतेचा संदेश दिला. प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या मास ड्रील आणि माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी लेजीम क्रीडा प्रकाराचे उत्तम सादरीकरण केले. शाळेच्या योग संघाने कौशल्यपूर्ण योगासनाची तर मल्लखांब संघाने चित्तथरारक मल्लखांब प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली. विद्यार्थ्यांमध्ये असणारी लवचिकता, एकाग्रता, आत्मविश्वास, शिस्त, संघभावना, नियमांचे पालन इ. गुण दिसून आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता आठवीचे विद्यार्थी ग्रीष्मा नांदोस्कर आणि सत्यजित सानप यांनी केले. तसेच पाहुण्यांची ओळख जान्हवी चाळके, मुख्याध्यापिका, प्राथमिक विभाग व शिक्षिका गीतांजली सकपाळ यांनी करून दिली. पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका पल्लवी तेंडुलकर यांनी केलेल्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली व नंतर शाळेतील विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली. तसेच सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.



*इ. ४ थी, रुद्र मोहिरे व आरोही मोहिरे*



*इ. ६ वी, स्वराज यादव व ओवी बोंडे*



*इ. सिनियर केजी, इरा लोकरे व जिज्ञेश बेर्डे - स्पॅनिश भाषेतून व्यक्त होताना*



*इ. ८ वी, मधुरा मुणगेकर व अनुश्री कोळेकर, संस्कृत भाषेतून व्यक्त होताना*










# शिक्षणतज्ज्ञ श्री. मनोज देशपांडे, डॉ. श्रीधर गद्रे आणि उद्योजक श्री. नरेंद्र काळे यांची श्रीक्षेत्र डेरवणला भेट




*डावीकडून : डॉ. अरविंद यादव, डॉ. मनोज देशपांडे, सौ. काळे, श्री. नरेंद्र काळे, डॉ. श्रीधर गद्रे, डॉ. सौ. गद्रे आणि डॉ. सुवर्णा पाटील*

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रसिद्ध उद्योजक श्री. नरेंद्र काळे तसेच भारतातील computational and theoretical chemistry या क्षेत्रातील नामवंत शास्त्रज्ञ डॉ. श्रीधर गद्रे आणि शिक्षणतज्ज्ञ श्री. मनोज देशपांडे यांनी सौ. काळे आणि गणित विषयातील तज्ज्ञ डॉ. सौ. गद्रे यांच्यासह दि. १० फेब्रुवारी रोजी डेरवण येथे भेट दिली.

मनोज देशपांडे हे 'Myelin' या संस्थेचे MD व CEO आहेत. 'Myelin' ही खासगी शाळांमधील 'संवाद आणि कार्यव्यवस्थापन' (communication and operational management) या क्षेत्रात आमूलाग्र बदल करू इच्छिणारी संस्था आहे. श्री. देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली शाळा-प्रवेशप्रक्रिया, शिक्षक-पालक सहयोग, कामगिरीचे मूल्यमापन अशा क्षेत्रात संस्था काम करीत असतानाच औद्योगिक क्षेत्रातून शाळांना निधी मिळविण्यासाठीही मार्गदर्शन केले जाते. 'AI' म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून शिक्षण व्यवस्था कार्यक्षम बनविणे आणि त्यामध्ये सातत्य आणि प्रगती राखणे यासाठी ही संस्था प्रयत्नशील असते. ओपस, इन्फोसिस, पर्सिस्टंट अशा नामवंत संस्थांमध्ये त्यांनी काम केलेले आहे. ते 'अल्ट्रा मॅराथॉन'मध्येही(मॅराथॉनपेक्षा दीर्घ पल्ल्याची स्पर्धा) सहभागी होतात. त्यांनी तंत्रज्ञान आणि अध्यापनशास्त्र यांची सांगड घालून शिक्षकांसाठी एक सर्वसमावेशक, वापरण्याला सुलभ असा मंच बनविला आहे जो केवळ शिक्षकांवरील प्रशासकीय बोजा कमी करेल असे नाही तर त्यांची आणि पर्यायाने विद्यार्थ्यांची व्यावसायिक, आणि शैक्षणिक गुणवत्ता वाढवेल. त्यांनी संस्थेविषयी आपला अभिप्राय समाजमाध्यमाद्वारे प्रसृत केला आहे :

''भारतात राहून आणि माझ्या आवडत्या विषयाशी निगडीत असे काम करताना मला रोजच काही नवीननवीन शिकायला मिळते. येथे कंटाळवाणे क्षण शोधूनही सापडणार नाहीत! कालच मला एसव्हीजेसीटीच्या शाळेला भेट देण्याचा योग आला. डेरवण या सतराशेच्या आसपास लोकवस्ती असलेल्या महाराष्ट्रातील एका गावात ही शाळा आहे. ती पाहून मी अगदी प्रभावित झालो! अगदी अपवादात्मक शाळांतच आढळतील अशा शाळेतील सुखसोई, त्याही अगदी नगण्य किंमतीत अगर मोफत दिलेल्या, शिवाय आर्थिक कमतरतेमुळे शिक्षणात येणारे अडथळे नाहीसे करण्याविषयीची त्यांची वचनबद्धता आणि बांधिलकी स्पष्ट दिसते. मला सर्वाधिक काय भावले असेल तर; शिक्षक, संचालकांपासून ते क्रीडाशिक्षक आणि साहाय्यक कर्मचाऱ्यांमध्ये असलेली एकात्म भावना आणि सामायिक दृष्टिकोन. ते सर्व जण एकच 'भाषा' बोलतात.'आपली मुलं सक्षम झाली पाहिजेत, ती आपली जबाबदारी आहे'. ते सगळे एकदिलाने मुलांच्या विचारशक्तीचे भरणपोषण करत आहेत; आणि शहरी आणि ग्रामीण भागात असलेल्या संधींमधली तफावत भरून काढीत आहेत. आदर्श शाळा कशी असावी याचे या शाळेचा परिसर हे एक उत्तम उदाहरण आहे. व्यापक आरोग्य व्यवस्था आणि विस्तीर्ण क्रीडांगण शारीरिक आणि बौद्धिक वाढीला पोषक ठरणारे आहे. या माझ्या भेटीमुळे मला प्रेरणा मिळाली, ऊर्जा मिळाली, पूर्वीपेक्षा अधिक एकाग्रता मिळाली. अध्यात्म, श्रद्धा आणि उत्कृष्टता यांचे येथे जे एक अनोखे मिश्रण साधलेले आहे, त्याने येथे एक खरोखर विलक्षण वेगळे वातावरण जाणवते. मल्लखांब खेळणारी, क्रीडांगणावर वावरणारी, उत्साह ओसंडून वाहणारी मुलं पाहून आता तीस तास होऊन गेले; तरी माझ्या डोळ्यासमोर; अजूनही स्पष्टपणे बागडत आहेत! ही शाळा केवळ 'अभ्यास' शिकवत नाही तर विद्यार्थ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणत आहे आणि त्यांच्या भविष्याला आकार देत आहे. ही संस्था केवळ स्वत:च्या मुलांना घडवीत नाही तर त्याही पलीकडे जाऊन अन्य शाळातील विद्यार्थी, पालक आणि परिसरातील समाज यांना सक्षम करण्यासाठी, कुपोषितांना पौष्टिक अन्न देणे, परिचारिका प्रशिक्षण शाळा चालवणे असे अनेक कार्यक्रम चालवीत आहे. एखादे कार्य तडीस नेण्यासाठी जर संघ उभा करायचा असेल तर त्यासाठी अशी दूरदृष्टी तर लागतेच आणि अथक परिश्रम करणारे नेतृत्वही लागते. या अतिशय आश्चर्यकारक अशा सामाजिक उपक्रमाचा मला परिचय करून दिल्याबद्दल मी श्री. नरेंद्रकाळे सरांचे अतिशय आभार मानतो. या शाळेच्या संचालिका शरयू यशवंतराव आणि त्यांचे सहकारी यांचाही मी आभारी आहे. या कार्यात मलाही सहभागी होऊन काही कार्य करण्याची संधी मिळावी अशी इच्छा मी व्यक्त करतो.''

डॉ. श्रीधर गद्रे हे भारतातील computational and theoretical chemistry या क्षेत्रातील नामवंत शास्त्रज्ञ असून त्यांना १९९३ साली Chemical Sciences साठीचा डॉ. शांतिस्वरूप भटनागर पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे. त्यांनी दीर्घ काळ पुणे विद्यापीठ आणि आय.आय.टी. कानपूरमध्ये विविध पदांवर अध्यापनाचे काम केलेले आहे. अनेक गुणवंत विद्यार्थी त्यांनी घडविले असून भारतातील computational chemistry and scientific computing या शाखेच्या वृद्धीमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. आपल्या डेरवण भेटीत त्यांनी बायो-केमिस्ट्री प्रयोगशाळेत वैद्यकीय विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

श्री. नरेंद्र काळे हे विविध क्षेत्रात काम केलेले उद्योगपती, "Bhau Institute"चे सह-संस्थापक आणि मार्गदर्शक, 'काळे लॉजिस्टिक्स'चे संचालक, 'काळे कन्सल्टन्ट्स'चे संस्थापक अध्यक्ष आहेत. आपल्या अभिप्रायात ते लिहितात,

''माझी डेरवणची वार्षिक 'यात्रा' वर्षभरासाठी माझ्या बॅटऱ्या पूर्णपणे रिचार्ज करते! डेरवणला पुन्हा एकदा भेट देण्याची सुवर्णसंधी मला मिळाली आणि गेल्या दोन दशकात तेथे झालेले उल्लेखनीय परिवर्तन पाहता आले. ही मूकक्रांती म्हणजे पारंपरिक भारतीय ज्ञान आणि आधुनिक वैद्यकशास्त्र आणि तंत्रज्ञान यांचा परिपूर्ण संगम आहे. शिष्य जेथे आपल्या सद्गुरूंचे प्रत्येक स्वप्न त्यांनी कल्पिलेल्याहून अधिक चांगल्या पद्धतीने प्रत्यक्षात आणण्याची पराकाष्ठा करतो अशी गुरुशिष्य परंपरा येथे जोमाने बहरत आहे.

एके काळचे दुर्गम आणि दुर्लक्षित कोकणातील डेरवण गाव आता उत्तम वैद्यकीय केंद्र झाले आहे. अभिमानास्पद असे, न्युक्लिअर मेडिसिन, सी.टी.स्कॅन, एम.आर.आय., केमो-थेरपी अशा सोयींनी युक्त असे ७५० खाटांचे रुग्णालय आता येथे आहे. शिवाय येथे ७५० वैद्यकीय विद्यार्थी शिकत आहेत. के. जी. ते बारावीपर्यंतची इंग्रजी माध्यमाची शाळा आहे. परिचारिका महाविद्यालय, ऑलिम्पिक दर्जाचे क्रीडासंकुल, अनेक सामाजिक आरोग्यविषयक आणि स्त्री-सबलीकरणाचे उपक्रम येथे सुरू आहे. आणि विशेष म्हणजे हे सर्व श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टने अत्यंत अल्प, नगण्य खर्चात उपलब्ध करून दिले आहे.''

## डॉ. प्रभाकरन दोराईराज यांची वालावलकर रुग्णालयाला भेट




*डावीकडून डॉ. नेताजी पाटील, डॉ. पूर्णिमा प्रभाकरन, डॉ. प्रभाकरन, प्रोफेसर वेल्हाळ, डॉ. सुवर्णा पाटील, रूपाली चव्हाण आणि वैद्यकीय विद्यार्थी*

डॉ. प्रभाकरन दोराईराज, एमडी, डीएम (कार्डिओलॉजी), एमएससी, एफआरसीपी, नवी दिल्ली, (CCDC)सेन्टर फॉर क्रॉनिक डिसीज कंट्रोलचे डायरेक्टर व डॉ. पौर्णिमा प्रभाकरन (डायरेक्टर ऑफ सेन्टर फॉर हेल्थ अनॅलिटिक्स रिसर्च अँड ट्रेंड्स (CHARTS), यांनी भ. क. ल. वालावलकर हॉस्पिटल आणि मेडिकल कॉलेजला दि.२४ डिसेंबर २०२४ रोजी भेट दिली. 'सी.सी.डी.सी.' ही संस्था 'आय.सी.एम.आर.'शी संलग्न आहे. ही संस्था सतत मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग या दीर्घकालीन आजारांवर संशोधन करीत असते. त्याचाच एक भाग म्हणून संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ. प्रभाकरन यांचे वालावलकर रुग्णालयाने मिळालेले सहकार्य मोलाचे आहे. डोंगराळ भागातील गावकऱ्यांना आरोग्य सेवा पुरवण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञाचा वापर कसा करता येईल या अनुषंगाने त्यांची डेरवण भेट महत्त्वाची होती. भेटीमध्ये त्यांनी डेरवण धनगरवाडी येथे भेटी दिल्या. कोकणातील गावातील जीवनशैली कशी आहे, हे प्रत्यक्ष पहिले. त्यानंतर हॉस्पिटलमध्ये राबवल्या जाणाऱ्या संशोधनपर सामाजिक प्रकल्पांची पाहणी करून त्यावर चर्चा केली व मोलाचे मार्गदर्शन केले. या भेटी अंती सी.सी.डी.सी.तर्फे वालावलकर ग्रामीण वैद्यकीयमहाविद्यालय व रुग्णालयात संगणकीकरण आणि डिजिटल हेल्थ उपलब्ध करण्याचा मानस असल्याचे नमूद केले.

# 'ड्रग डिस्कव्हरी' या विषयावर डॉ. सुधीर कुलकर्णी यांचे व्याख्यान.



*डॉ. सुधीर कुलकर्णी आणि डॉ. यामिनी कुलकर्णी*

'ड्रग डिस्कव्हरी' या नावीन्यपूर्ण विषयावर शास्त्रज्ञ डॉ. सुधीर कुलकर्णी यांनी दि. ६ जानेवारी २५ रोजी वालावलकर रुग्णालयात व्याख्यान दिले. मधुमेहामुळे पायाला जखमा होणे, त्या चिघळणे, त्याचे गॅंग्रीन होणे आणि कधी कधी तर पायावर शस्त्रक्रिया करावी लागणे अशी बरीच गुंतागुंत रुग्णांना सहन करावी लागते आणि आयुष्यातील उमेदीचे दिवस अंथरुणात काढावे लागतात. डॉ. सुधीर कुलकर्णी यांनी बायोकेमिस्ट्रीत 'पीएच.डी.' संपादन करून आपल्या ज्ञानाचा उपयोग अशा रुग्णांच्या व्यथा दूर करण्यासाठी केला. एक अत्यंत साधे पण प्रभावकारी औषध मधुमेहामुळे पायाला होणाऱ्या जखमांसाठी तयार केले आहे.

चाचण्यांसाठी प्रथम प्रयोगशाळेत हे औषध निर्माण केले गेले आणि त्यानंतर ते 'प्री-क्लिनिकल' म्हणजे उंदरांवर वापरले गेले. त्याचा उत्तम परिणाम आढळून आल्यावर ते 'क्लिनिकल ट्रायल'करिता वापरले गेले आणि आता सेंट्रल ड्रग्ज स्टॅन्डर्ड कंट्रोल ऑर्गनायझेशन (CDSCO)ने नुकतीच भारतात त्याच्या उत्पादनासाठी मान्यता दिली आहे. कंपनीने 'डायलकस' नावाने 'इप्का लॅबोरेटरीज लिमिटेड'ला या उत्पादनाचा परवाना दिला आहे. सध्या डायबेटिक फूट, सोरायसिस आणि त्वचेच्या इतर रोगांच्या उपचारांसाठी याचा वापर होत आहे. डॉ. कुलकर्णी यानी वैद्यकीय विद्यार्थ्यांना औषध निर्मितीपासून त्याचे मार्केटपर्यंत पोहोचणे याविषयी विस्तृत सादरीकरण केले आणि विद्यार्थ्यांना या विषयात रस निर्माण होण्याकरिता हे सादरीकरण नक्कीच प्रोत्साहित करेल अशी आशा त्यांनी व्यक्त केली. त्यांच्यासोबत आलेल्या डॉ. यामिनी कुलकर्णी, या सध्या एका बायोटेक्नॉलॉजी कंपनीत इंटेलेक्चुअल प्रॉपर्टी (आयपी) सल्लागार म्हणून कार्यरत असून, पेटंटचा मसुदा तयार करणे, खटला चालविणे, पेटंट शोधणे, साहित्य याकरिता कार्यरत आहेत. त्यांनीही आपल्या विषयासंबंधी विद्यार्थ्यांना संबोधित केले.

## सुनील गोसावी, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश रत्नागिरी यांची श्रीक्षेत्र डेरवण येथे सदिच्छा भेट




*उजवीकडून : डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. नेताजी पाटील, श्री. विकासराव वालावलकर, न्यायमूर्ती सुनील गोसावी आणि अन्य*

''काल जोशी महाराजांनी मला शिवसृष्टी, आश्रम, गोशाळा, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स आणि वालावलकर हॉस्पिटल दाखवण्यासाठी जी व्यवस्था केली होती त्यामुळे मला या सर्व गोष्टी थोड्या वेळात पाहता आल्या. एवढे मोठे सामाजिक कार्य कोणताही गाजावाजा न करता तेथे चालतं, त्यासाठी कुणाहीकडून देणगी घेतली जात नाही. सर्वत्र कमालीची स्वच्छता राखली जाते, इतकी सुंदर सेवा, सामाजिक कार्य केले जाते हे पाहून मला खूप आश्चर्य वाटलं आणि आनंद झाला. तुम्ही सर्वांनी हे सर्व कार्य कसे चालते हे दाखवण्यासाठी मदत केलीत. मला यापुढेही तुमच्या संस्थेत यायला आवडेल. तुमच्या सर्वांच्या मदतीबद्दल खूप खूप धन्यवाद.जोशीमहाराजांना माझा नमस्कार कळवा.- ***सुनील गोसावी, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश रत्नागिरी यांनी भेटीदरम्यान दिलेला अभिप्राय (३० जानेवारी २०२५)***

## श्री. जीवन कायंदे यांची वालावलकर हॉस्पिटलला सदिच्छा भेट



*डावीकडून : डॉ. सुवर्णा पाटील, सौ. कायंदे आणि श्री. कायंदे*

श्री. जीवन कायंदे, अध्यक्ष, महाराष्ट्र सेवा समिती संघटना (कॅल्गरी अल्बर्टा, कॅनडा) यांनी दि. १८ फेब्रुवारी २०२५ रोजी वालावलकर हॉस्पिटलला सदिच्छा भेट दिली. भेटीदरम्यान ''परिसरातील लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी केलेली ही सेवा अद्भुत आहे.'' असे प्रशंसोद्गार काढत त्यांनी संस्थेचे तोंडभरून कौतुक केले आणि रुग्णसेवेसाठी 'एम. एस. एस. ओ., कॅनडा' ही संस्था या कार्याला हातभार म्हणून आर्थिक पाठबळ देण्यास सज्ज असल्याचे आश्वासन दिले.

# स्कायगेझर्स क्लब : दुर्बिणीद्वारे विश्वाचे निरीक्षण





*शाळेच्या दुर्बिणीतून पाहिलेली चंद्रकोर व सन स्पॉट्स*

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज् ट्रस्ट इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स, सावर्डे येथे २० आणि २१ फेब्रुवारी २०२५ रोजी आकाश निरीक्षणाचा कार्यक्रम यशस्विरीत्या आयोजित करण्यात आला. आकाश निरीक्षणाच्या मार्गदर्शनासाठी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून एरोनॉटिक्स अँड स्पेस एक्सप्लोरेशन कंपनीचे अभियंते श्री. कैलास बेलेकर, श्री. शशिकांत गवारी आणि त्यांचे सहकारी लाभले होते.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थितांना पीपीटीद्वारे महाविस्फोटाने विश्वाची उत्पत्ती, आकाशात दिसणाऱ्या दीर्घिका, धूम्रमय नक्षत्रसमूह म्हणजेच नेब्युला, विविध नक्षत्रं, नव्याने जन्माला आलेले तारे व अस्ताला जाणारे तारे यांची ओळख, यांसारख्या खगोलशास्त्रीय घटनांची माहिती सचित्र दिली. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना आकाश निरीक्षणासाठी मैदानावर नेण्यात आले.

सर्वप्रथम आकाशातील ध्रुवतारा कसा शोधावा याचे मार्गदर्शन करून ओरायन, कृतिका नक्षत्र, शर्मिष्ठा नक्षत्र, रोहिणी नक्षत्र, ग्रीष्म त्रिकोणाचे काल्पनिक शिरोबिंदू असलेले 'अल्टेअर', 'डेनेब' आणि 'वेगा' हे तेजस्वी तारे, गुरू, शुक्र, मंगळ इत्यादी ग्रह तसेच वृषभ, मिथुन, सिंह, कन्या, वृश्चिक इत्यादी राशी स्पष्टीकरणासह दाखविल्या. हे सर्व आकाशात दाखवत असताना त्यांच्याशी निगडित असलेल्या हिंदू, ग्रीक आणि इजिप्त संस्कृतीमधील पौराणिक कथा सांगत, त्यामागील असणारा वैज्ञानिक दृष्टिकोन सांगितला.

तज्ज्ञ मार्गदर्शकांनी आणलेल्या दोन आणि शाळेची एक अशा तीन दुर्बिणींद्वारे आकाश निरीक्षणाचा आनंद उपस्थितांनी उपभोगला. लाल रंगाचा मंगळ, शुक्राची कोर, गुरू व त्याचे चार चंद्र, तसेच ओरायन नेब्युला, कृतिका नक्षत्र, बायनरी स्टार – वशिष्ठ व अरुंधती, बी-हाइव क्लस्टर, चंद्र, चंद्रावरचे खड्डे अशा प्रकारची खगोलीय निरीक्षणे दुर्बिणीद्वारे रात्री व सूर्योदयानंतर ९९.९९% सूर्यकिरणे अवरोधित करून सूर्यावरील सन स्पॉट दाखवले. केवळ चित्रात पाहिलेल्या खगोलीय संकल्पना प्रत्यक्ष पाहिल्याने विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल जागृत झाले.

एसव्हीजेसीटी शाळेने विद्यार्थ्यांसाठी हा आकाश दर्शनाचा कार्यक्रम व निवासाची व्यवस्था नि:शुल्क आयोजित केली होती. या खगोल निरीक्षण कार्यक्रमामध्ये १४० विद्यार्थी व शिक्षक सहभागी होऊन उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अनेक शिक्षक-विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त करत अभ्यासपूर्ण विश्लेषण व दुर्बिणीद्वारे ग्रह-तारे स्पष्ट बघितल्याचा अनुभव अविस्मरणीय होता अशी प्रतिक्रिया दिली.














तारे जमीं पर
उतरें जो आंगन को सुनहरा सा करने
मन के अंधेरे को रोशन सा कर दें.......

# महाराष्ट्राच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी महाराष्ट्र मल्लखांब संघाचे शिबिर





३८ वी राष्ट्रीय मल्लखांब क्रीडा स्पर्धा ११ फेब्रुवारीपासून उत्तराखंड येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंनी ४ सुवर्ण, ४ रौप्य व ५ कांस्य पदकांची कमाई केली. या स्पर्धेकरिता महाराष्ट्र संघातील सहा मुले व मुली यांचे स्पर्धापूर्व सराव व प्रशिक्षण शिबिर एस.व्ही.जे.सी.टी क्रीडासंकुलात पार पडले. महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन, महाराष्ट्र हौशी मल्लखांब संघटना, रत्नागिरी जिल्हा मल्लखांब संघटना यांच्या मार्गदर्शनाने हे शिबिर संपन्न झाले. संघातील खेळाडूंनी कसून सराव केला.

संघाचे प्रशिक्षक संदीप शिंदे, संघाचे व्यवस्थापक पंकज शिंदे, तसेच महिला प्रशिक्षक साक्षी गर्गे, यांनी बारा खेळाडूंकडून कसून सराव करून घेतला. त्यांना विविध डावपेच शिकवले. वडाळा येथे दीडशे खेळाडूंमधून १२ खेळाडूंची राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड केली गेली. उत्तराखंड येथे थंड हवेचे वातावरण आहे. त्याचबरोबर ऑक्सिजनची पातळीही कमी आहे. या पार्श्वभूमीवर सकाळी पाच ते नऊ आणि संध्याकाळी पाच ते नऊ या वेळेत हे प्रशिक्षण घेतले गेले. प्रशिक्षणाबरोबरच टीम बॉण्डिंग, टीम ॲक्टिव्हिटी, त्याचबरोबर स्विमिंग, वर्कआऊट, रनिंग, मेडिटेशन याचेही धडे या संघाला दिले. वालावलकर हॉस्पिटलच्या सहकार्याने खेळाडूंची वैद्यकीय तपासणीसुद्धा करण्यात आली. डेरवण रुग्णालयातील डॉक्टरांचा सल्ला, मसाज थेरपीस्ट तसेच डाएटीशियन यांच्या योग्य मार्गदर्शनाने खेळाडूंना योग्य डाएट देण्यात आला. याप्रमाणे सारं काही या खेळाडूंना दिलं जात होतं. त्यामुळे हे खेळाडू या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये मोठे यश मिळवतील, असा विश्वास या संघाचे प्रशिक्षक संदीप शिंदे व पंकज शिंदे यांनी व्यक्त केला होता.

महाराष्ट्राच्या संघामध्ये दोन खेळाडूंना शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त झाला आहे, तर अनेक जण यापूर्वी राष्ट्रीय स्पर्धेत खेळलेले आहेत. त्यामुळे या वेळीही उत्तम यश या स्पर्धेत मिळेल, असा विश्वास महिला पंच साक्षी गर्गे यांनी व्यक्त केला होता. पुरलेला मल्लखांब, रोप मल्लखांब, लटकलेला मल्लखांब अशा प्रकारात खेळाडूंनी आपले कौशल्य प्रदर्शित केले.

या संघामध्ये जान्हवी जाधव, रूपाली गंगावणे या आंतरराष्ट्रीय खेळाडू असून यांना शिवछत्रपती पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच नेहा क्षीरसागर, पल्लवी शिंदे, निधी राणे, प्रणाली मोरे, आदित्य पाटील, वृषभ घुबडे, सोहेल शेख, दर्शन मणियार, शार्दुल ऋषिकेश, मृगांक पाठारे या राष्ट्रीय खेळाडूंचा समावेश होता.





# ग्रामीण खेळाडू विकसन प्रकल्पाच्या वार्षिक क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न





एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलात दि. १६ फेब्रुवारी २०२५ रोजी 'ज्ञान प्रबोधिनी क्रीडाकुल व टाटा ट्रस्टस्' आयोजित ग्रामीण खेळाडू विकसन प्रकल्पाच्या वार्षिक क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील एकूण चार केंद्रांपैकी एक महत्त्वाचे केंद्र असलेल्या चिपळूण केंद्र - हब अंतर्गत न्यू इंग्लिश स्कूल सती-चिंचघरी, महादेवराव शिर्के माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय भोम, मोहन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय आकले, न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेज आंबडस, 'आर. सी. काळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय' पेढे या पाच शाळांनी सहभाग नोंदविला होता. या पाचही उपकेंद्रांमधील एकूण १९५ खेळाडूंनी या स्पर्धांमध्ये आपापल्या उपकेंद्राचे प्रतिनिधित्व केले.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. आनंद लुंकडसर (खो खोचे राष्ट्रीय प्रशिक्षक) यांनी श्रीफळ वाढवून स्पर्धेची सुरुवात केली. तसेच या प्रकल्पाचे मॅनेजर संकल्प थोरात, स्पोर्ट सायकॉलॉजिस्ट अश्वगंधा पारडे, क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर, चिपळूण केंद्र क्रीडाकुल प्रकल्प समन्वयक तुषार कदम, साहाय्यक केंद्र क्रीडा प्रशिक्षक विशाल सुर्वे, गणेश सावर्डेकर, सतीश सावर्डेकर, अमोल सुर्वे, देवराज गरगटे आणि ज्ञान प्रबोधिनी चिपळूणचे सदस्य माधव मुसळे, डॉ. सौ. स्वाती मुसळे आदि मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेमध्ये डॉजबॉल, लंगडी, मॉडीफाइड राउंड रन, ८ X ५० मी रिले या सांघिक स्पर्धा तर ५० मी., १०० मी धावणे, मेडिसिन बॉल थ्रो, टेनिस बॉल थ्रो अशा वैयक्तिक स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांमध्ये सर्वाधिक खेळामध्ये विजयी ठरणाऱ्या उपकेंद्राला सर्वोत्कृष्ट उपकेंद्र म्हणून गौरविण्यात आले. या किताबासाठी आकले व भोम या उपकेंद्रांमध्ये स्पर्धेची चुरस रंगली होती, व शेवटी फार थोड्या गुणांच्या फरकाने भोम हे यावर्षीचे सर्वोत्कृष्ट उपकेंद्र ठरले.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे या स्पर्धेच्या माध्यमातून काही गुणवंत खेळाडूंची निवड करून त्या खेळाडूंना चिपळूण केंद्राच्या वतीने निगडी येथे होणाऱ्या केंद्रीय स्पर्धांमध्ये चिपळूण केंद्राचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे. या केंद्रीय स्पर्धांमध्ये चिपळूण केंद्रासोबत बारामती, हराळी, मावळ असे एकूण चार हब स्पर्धेच्या माध्यमातून समोरासमोर येणार आहेत.





भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

# डेरवण युथ गेम्स १० मार्च पासून

श्री विठ्ठलराव जोशी चॅरीटीज ट्रस्ट आयोजित शिवजयंती निमित्त होणाऱ्या अकराव्या डेरवण युथ गेम्सचे दि. १० मार्च ते १७ मार्च २०२५ या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे.

डेरवण येथील क्रीडासंकुलात १८ खेळांच्या स्पर्धांसाठी जय्यत तयारी सुरु झाली आहे. या स्पर्धेमध्ये अ‍ॅथलेटिक्स, जिम्नॅस्टिक, बॅडमिंटन, टेबल टेनिस, जलतरण, तिरंदाजी, नेमबाजी, बुद्धिबळ, कॅरम; देशी खेळांना प्रोत्साहन देण्याकरिता कबड्डी, खो खो, लंगडी, मल्लखांब, योगा या खेळांसह फुटबॉल, व्हॉलिबॉल, बास्केटबॉल, या खेळांचा समावेश आहे. त्याचबरोबर ऑलिम्पिकमध्ये समाविष्ट करण्यात आलेला वॉल क्लाइम्बिंग या साहसी खेळाचीही स्पर्धा पाहण्यास मिळणार आहे.

भारतीय खेळ आणि ऑलिम्पिक खेळांचा संगम असणाऱ्या या स्पर्धेत राज्यभरातील आठ हजारापेक्षा अधिक खेळाडू सहभागी होणार आहेत. यंदाही विजेत्यांना पदके, चषक आणि रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात येणार आहे. १२०० पदके, ११५ करंडक स्पर्धेत खेळाडूंना बक्षीस रूपाने देण्यात येणार आहे. अनेक राष्ट्रीय खेळाडूंनी या स्पर्धेत भाग घेण्याचे निश्चित केले आहे. विविध क्रीडा प्रकारात राज्यातील खेळाडूंचा चित्तथरारक खेळ या स्पर्धेच्या निमित्त पाहण्याची पर्वणी प्रेक्षकांना मिळणार आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन १० मार्च रोजी रायफल व पिस्तूल नेमबाजी प्रकारातील द्रोणाचार्य पुरस्कार प्राप्त आणि ऑलिम्पियन स्वप्नील कुसळे यांच्या प्रशिक्षिका दिपाली देशपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पार पडणार आहे.

या स्पर्धेत ८ वर्षांखालील ते १८ वर्षांखालील खेळाडू सहभागी होणार आहेत. ०८ मार्चपर्यंत नोंदणी सुरु राहणार असून ऑनलाईन नोंदणी www.svjctsportsacademy.com या वेबसाईटवर सुरु झाली आहे. स्पर्धेच्या नोंदणीसाठी ९८२२६३९३०६/८८०५२२८९२२/ ९८५०८८३२८३/ ९३२५४४९२०१ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.




संग्रहित चित्र

**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक :** श्री. विकास कमलाकर वालावलकर यांनी धनश्री ऑफसेट, ३/२०८, पत्रकार कॉलनी, कुवरबाव, रत्नागिरी येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, डेरवण, पो. सावर्डे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६०६ येथून प्रकाशित केले.Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५, उपसंपादक : सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०
नोंदणी क्रमांक : MAHMAR/2022/86035